पोलीस ठाणे नळदुर्ग ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** नळदुर्ग

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0405 **Year (वर्ष):** 2026

   **Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 21/08/2026 20:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** शुक्रवार
      **Time Period (कालावधी):** पहर 6
      **Date From (दिंनाक पासून):** 21/08/2026
      **Date To ( दिंनाक पर्यंत):** 21/08/2026
      **Time From (वेळेपासून):** 16:02 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 16:10 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिंनाक ):** 21/08/2026 **Time (वेळ):** 20:50 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 032
      **Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 21/08/2026 20:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पूर्व, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र ग्रामीण बँक समोर, जळकोट ,तुळजापुर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** नळदुर्ग
      **District(State) (जिल्हा(राज्य)):** धाराशिव(महाराष्ट्र)



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बाळासाहेब मनोहर नरवटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,धाराशिव,नळदुर्ग,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,धाराशिव,नळदुर्ग,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9309102143

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरेश श्रीमंत बिराजदार | | | 1. सिंदगाव,तुळजापूर,नळदुर्ग, धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 11000/ रूपये | 11,000.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फियाद दिंनाक 21.08.2026
मी बाळासाहेब मनोहर नरवटे, वय 37 वर्ष, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव. मोबाईल नंबर 9309102143, समक्ष पोलीस ठाणे नळदुर्ग येथे हजर राहुन फिर्याद देतो की,
मी दिंनाक 21.08.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे हजर असताना, मला पोलीस उप अधीक्षक योगेश वेळापुरे यांनी त्यांचे चेंबर मध्ये बोलावुन तक्रारदार सलीम इलाही नदाफ, वय 24 वर्षे व्यवसाय मजुरी, रा. सिंदगाव ता. तुळजापुर जि. धाराशिव यांची ओळख करुन देवुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशित केले. त्यावरुन मी तक्रारदार सलीम नदाफ यांना माझे केबिनमध्ये बोलवुन त्यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी त्यांची तक्रार सांगितली. त्यातील थोडक्यात मजकुर असा की, तक्रारदार यांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सन 2025-26 मध्ये घरकुल मंजुर झाले आहे. तसेच मंजुर घरकुलाचे तक्रारदार यांना अनुक्रमे 1)15,000/- व 2) 70,000/- रुपये हप्ता पडलेला आहे. उर्वरीत तिसरा हप्ता पडणे बाकी आहे. सदरचा हप्ता न पडल्याने तक्रारदार याचे घराचे बांधकाम बंद आहे.
दिंनाक 20.08.2026 रोजी मौजे सिंदगाव ता. तुळजापूर येथील सरपंच श्री सुरेश श्रीमंत बिराजदार यांची तक्रारदार नदाफ याचेसोबत अचानक भेट झाल्यानंतर सरपंच सुरेश बिराजदार यांनी तक्रारदार यांना त्यांचे घराचे बांधकाम बंद का असे विचारले. त्यावेळी तक्रारदार यांनी सरपंच बिराजदार यांना सांगितले की, घरकुलाचा तिसरा हप्ता अजुन पडलेला नाही. त्यावेळी सरपंच बिराजदार म्हणाले की, तुझ्या घरकुलाचा तिसरा हप्ता टाकण्यासाठी पंचायत समितीच्या साहेबांना सांगुन, घरकुलाचा तिसरा हप्ता लवकर टाकण्यास सांगतो. त्यासाठी पंचायतीच्या साहेबांना काहीतरी पैसे दयावे लागतील. तेव्हा तक्रारदार यांनी विचारले की, किती पैसे दयावे लागतील. तेव्हा सरपंच बिराजदार यांनी 4,000/- रु. लागतील असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना नाईलाजास्तव होकार देऊन तेथुन निघुन जात असताना, सरपंच बिराजदार यांनी तक्रारदार यांना सांगितले की, तुझा मित्र दीपक परशेटटी याचेपण घरकुलाचा तिसरा हप्ता बाकी असुन, त्याचेपण घरकुलाचा तिसरा हप्ता टाकण्यासाठी तो पण 7,000/- रु. देणार आहे. तुमच्या दोघांचे मिळुन 11,000/- रु. घेऊन ये असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व त्याचा मित्र दिपक परशेट्टी यांचे घरकुलाचा तिसरा हप्ता टाकण्यासाठी सरपंच सुरेश श्रीमंत बिराजदार हे पंचायत समिती मधील साहेबांना सांगुन काम करुन घेतो असे सांगुन 11,000/- लाच मागणी केली आहे. वगैरे मजकुराचा तक्रारी अर्ज दिला. त्यावरुन आम्ही कार्यकरी अभियंता, महावितरण, धाराशिव यांना लेखी पत्र देवुन दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले. त्यावेळी मी तक्रारदार, पंच व स्टाफ यांचा आपसी परिचय करुन दिला. त्यानंतर माझे सुचनेवरुन तक्रारदार नदाफ यांनी त्यांची तक्रार दोन्ही पंचासमक्ष पुन्हा सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार व तोंडी तक्रार एकच असल्याची पंचाची खात्री झाल्यानंतर पंच क्रमांक 1 म्हणुन विवेक पाटील व पंच क्रमांक 2 म्हणुन दिलीप राठोड यांनी तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे शासकीय वाहन व तक्रादाराचा मित्र दीपक परशेटटी याचे कडील खाजगी चारचाकी वाहनाने तक्रारदार, त्याचा मित्र दिपक परशेटटी, पंच व सापळा पथक असे कारवाईसाठी लागणारे सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय, धाराशिव येथुन रवाना होवुन मौजे सिंदगाव येथे रोडलगत सुरक्षित ठिकाणी जावुन थांबलोत. ü
तेथे गेल्यानंतर तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनाक 21.08.2026 रोजी सरपंच बिराजदार यांची मौजे सिंदगाव येथे समक्ष भेट घेण्यासाठी पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निणय घेतला. तेथे गेल्यावर आम्ही तक्रारदार यांना सरपंच बिराजदार यांची कोठे भेट होईल याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी फोन करुन त्यांना विचारावे लागेल असे सांगितले. त्यानंतर यातील तक्रारदार नदाफ व पंच यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती सांगुन त्यामध्ये नवीन मेमरीकार्ड टाकले व सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांना पंचासमक्ष सरपंच बिराजदार यांना फोन लावण्यास सांगितले. त्यावरुन तक्रारदार नदाफ यांनी त्यांचे



Scanned with OKEN Scanner

मोबाईल क्रमांक 9325520558 यावरुन सरपंच बिराजदार यांचे मोबाईल क्रमांक 9822746378 यावर फोन केला असता, सरपंच बिराजदार हे म्हणाले कि, ते त्यांच्या कामानिमीत्त जळकोट येथे आले आहेत असे म्हणुन फोन ठेवुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा सरपंचाला फोन करुन म्हणाले कि, त्यांचे पण जळकोट येथे काम आहे. ते पण तिकडे येत आहे असे म्हणाल्याने. सरपंच यांनी होकार दर्शविल्याने आम्ही,तक्रारदार,पंच व सापळा पथक जळकोट येथे रवाना होवुन उमरगा कडुन येणा-या रोडलगत सुरक्षित ठिकाणी जावुन थांबलो. त्यानंतर यापुर्वी वापरण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंचा समक्ष चालु करुन पंचासमक्ष सरपंच बिराजदार यांना फोन लावण्यास सांगितले. त्यावरुन तक्रारदार नदाफ यांनी सरपंच बिराजदार यांना फोन केला असता, सरपंच बिराजदार हे म्हणाले कि, मी जळकोट येथे आहे, बबलु पाटील व बालाजी याच्या दुकानासमोर ये, असे म्हणाल्याने आम्ही तक्रारदार व पंच क्रमांक 1 पाटील यांना तक्रारदार यांचेकडील मोटार सायकल क्रमांक एमएच 13 बी. सी. 0451 ने व्हॉईस रेकॉर्डर लावुन जळकोट येथे सरपंच बिराजदार यांची लाचमागणी पडताळणी करीता रवाना केले. सदर ठिकाणी तक्रारदार यांनी सरपंच बिराजदार यांची पंचासमक्ष महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या समोरील,उमरगा नळदुर्ग रोड जाणा-या सर्व्हिस रोडच्या बाजुला भेट घेतली. तेव्हा त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलणे झाले दरम्यान सरपंच बिराजदार यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मंजुर घरकुलाचा तिसरा हप्ता पंचायत समितीच्या जिओ टॅगिंग करणा-या साहेबांना सांगुन टाकुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 4,000/- रुपये व तक्रारदार यांचे मित्र दिपक परशेट्टी यांचेपण घरकुलाचा तिसरा हप्ता टाकण्यासाठी 7,000/- रुपये असे एकुण 11,000/- रुपये लाचेची तक्रारदार यांचकडे पंचासमक्ष मागणी केली. त्यावरुन सरपंच बिराजदार यांचेविरुध्द जळकोट येथे सापळा आजमावण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यावरुन दिंनाक 21.08.2026 रोजी पंच क्र. 1 विवेक पाटील यांना तक्रारदार नदाफ यांचे सोबत सापळा कारवाईसाठी जाण्याच्या सुचना दिल्या. तसेच ऑंथ्रसीन पावडर लावलेली लाच रक्कम 11,000/- रुपये हि तक्रारदार यांचे पॅन्टच्या समोरील उजवे बाजुच्या खिश्यामध्ये पोहेकॉ / माने यांना ठेवण्यास सांगुन. ती लाच रक्कम तक्रारदार यास उजव्या हाताने सरपंच बिराजदार यांना देवुन त्यांनी जर ते घेतल्या तर दोन्ही हात वर करुन आळस देण्याचा सुचक इशारा करावा असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर पंच क्रमांक 01 विवेक पाटील यांचे समक्ष तक्रारदार यांच्या शर्टचे आतमध्ये बनीयानला आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पिनने लावण्यात आला. पंच क्र 2 राठोड यांना सापळा पथकासोबत राहुन सर्व सापळा कारवाईमध्ये होणारे घडामोडीवर लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक 01 विवेक पाटील यांना सरपंच बिराजदार यांची भेट घेण्यासाठी जळकोट येथे रवाना केले. त्यांचे मागे सापळा कारवाईतील अधिकारी, पंच क्र. 2 व अंमलदार हे शासकिय व खाजगी वाहनाने रवाना झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी सरपंच बिराजदार यांची महाराष्ट्र ग्रामीण बँक, उमरगा नळदुर्ग रोडचे सर्व्हिस रोडलगत, जळकोट येथे भेट घेतली व सरपंच बिराजदार यांनी लाचेची मागणी केल्यानंतर तक्रारदार यांनी अँथ्रासिन पावडरयुक्त लाच रक्कम पंचासमक्ष सरपंच बिराजदार यांना दिली त्यानंतर तक्रारदार यांनी सरपंच बिराजदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित ईशारा केला. तेव्हा तेथे आम्ही व सापळा पथक तात्काळ गेलो व सरपंच बिराजदार यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पंच क्र. 1 यांना सरपंच बिराजदार यांची अंगझडती घेण्यास सांगितले. त्यावेळी सरपंच बिराजदार यांचे पॅन्टच्या उजव्या खिश्यात लाच रक्कम 11,000/- रुपये मिळुन आली. तसेच आम्ही सरपंच बिराजदार यांचे उजवे हाताची पाहणी केली असता, हातावर ठिकठिकाणी ऍ◌ंथ्रासिन पावडरची हिरवट रंगाची दिसुन आली. सरपंच बिराजदार यांचे अंगझडतीत मिळुन आलेल्या सदर रक्कमेची पंच क्रमांक 2 यांचेकडील कागदावर लिहिलेल्या नोटांच्या क्रमांकाची तुलना करुन पाहणी केली असता, 500/- रुपये दराच्या 22 चलनी नोटा ज्याचे क्रमांक व पंच क्रमांक 2 यांचेकडील कागदावर लिहिलेले क्रमांक एकच असल्याचे दिसुन आले. सदर ऍ◌ंथ्रासिन पावडरयुक्त 11,000/- रुपये पंच क्रमांक 02 राठोड यांचे ताब्यात देण्यात आल्या. सदर सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी लोकसेवक सुरेश श्रीमंत बिराजदार,वय 49 वर्षे,व्यवसाय सरपंच (प्रशासक), रा.सिंदगाव, ता.तुळजापूर, जि. धाराशिव यांनी तक्रारदार सलीम नदाफ व त्यांचा मित्र दिपक परशेटटी यांचे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजुर असलेल्या घरकुलाचा तिसरा हप्ता टाकण्यासाठी पंचायत समिती येथील जिओ टॅगिंग करणा-या साहेबांना पैसे दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचे कडे पंचासमक्ष 11,000/- रुपयांची लाच मागणी करुन स्विकारण्याचे मान्य करुन तक्रारदार यांचेकडुन 11,000/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने माझी त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलम 7 अ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिंयाद आहे.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA SHANTARAM GAIKWAD(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): RAVINDRA SHANTAR

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.):

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार,
पोलीस ठाणे नळदुर्ग.

Scanned with OKEN Scanner